माहिती अधिकार कायद्याचा प्रसार करणारे झुंजार मासिक !

# नागरिक अधिकार

संपादक : सुभाष बसवेकर

आरएनआय रजि नं. MAHMAR/2011/40781 www.rtimahasangh.weebly.com

वर्ष १० वे. अंक ७ वा रायगड-पनवेल दिनांक १ ते ३१ जूलै २०२१ पाने १० किंमत २० रूपये




## माहिती अधिकार कार्यकर्ता धमकी, मारहाण, हल्ला काय करावे ? काय करु नये ?

## सामान्य माणूस विरुध्द नोकरशाही

## सरकारी कार्यालयातील बेकादेशीर बोर्ड हटवा



भारतीय दंड कायदे नुसार (I.P.C.)

सरकारी कर्मचाऱ्यांना सुरक्षा प्रदान करण्यासाठी केलेले कायदे

नगर भूमापन अधिकारी - पिंपरी चिंचवड

| अ.क्र. | गुन्हा | भारतीय दंड विधान कायदा (I.P.C.) कलम | शिक्षा |
|---|---|---|---|
| १ | सरकारी कामात अडथळा आणणे. | ३५२ व ३५३ | ५ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा |
| २ | सरकारी कर्मचाऱ्यांशी वाद घालणे. | ५०४ | २ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा |
| ३ | सरकारी कर्मचाऱ्यांस अपशब्द बोलणे. | ५०४ | ३ ते ७ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा |
| ४ | सरकारी कर्मचाऱ्यांस धमकी देणे. | ५०४ | ३ ते १० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा |
| ५ | सरकारी कर्मचाऱ्यांस मारहाण करणे. | ३३२ व ३३३ | ५ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा |
| ६ | सरकारी कर्मचाऱ्याकडून खंडणी मागणी करणे. | ३८३, ३८४, ३८६ | २ ते १० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा |
| ७ | कार्यालयात जबरदस्ती प्रवेश करणे. | ४२७ | २ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा |
| ८ | सरकारी मालमत्तेस नुकसान पोहचविणे. | ३७८ व ३७९ | ३ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा |
| ९ | सरकारी दस्तावेज चोरी करणे. | ३७८ व ३७९ | ३ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा |
| १० | सरकारी दस्तावेजास नुकसान पोहचविणे. | ३७८ व ३७९ | ३ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा |
| ११ | अनधिकृत जमाव गोळा करणे. | १४१ व १४३ | ६ महिन्याची सश्रम कारावासाची शिक्षा |
| १२ | सरकारी कार्यालयात गोधळ घालणे. | १४६, १४८, १५० | ६ महिने ते २ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा |

वाहन चालविताना सिट बेल्टचा वापर नक्की करा.

सौजन्य : महाराष्ट्र राज्य भूमी अभिलेख कर्मचारी संघटना - पुणे जिल्हा

## संविधानातील कलम ३६० लागू करा आर्थिक आणिबाणी लावा. सरकारी नोकरांचे पगार ५० टक्के कपात करा.

## बेस्ट ॲक्टीविस्ट ऑफ द मंथ, जूलै २०२१



## माया अशोक मगर

मासिक **नागरिक अधिकार**

**सुभाष बसवेकर**
● संपादक ●

**शेखर कोलते**
●कार्यकारी संपादक●

जिल्हा - प्रतिनिधी

जयवंत टेंबूलकर (मुंबई)
प्रभाकर गंगावणे (रायगड)
अब्राहम आढाव (पुणे)
संतोष कदम (सातारा)
बंडोपंत चौगुले (सांगली)
अर्जन रामा असणे (जळगांव)
सोपान पवार (औरंगाबाद)
बळवंत जाधव (लातूर)
जयसिंग सिल्लोडे (जालना)
विलास प्रताप शिंदे (नांदेड)
गोपाळ तौर (बीड)
रोहिदास सावळे (धुळे)
रविकुमार गोरे (हिंगोली)
नामदेव चापके (परभणी)
उज्ज्वल राजपूत (नाशिक)
राजू शिंदे (नंदूरबार)
संतोष जाधव (यवतमाळ)

पत्ता : **नागरिक अधिकार**
शॉप नं.०३ प्लॉट नं.०६
हर्मोनी बिल्डींग सेक्टर ०१ खांदा कॉलनी
नवीन पनवेल ४१०२०६
मो.९२२३५१६९२०
e- mail : rtimahasangh@gmail.com

अंक दर महिन्याच्या एक तारखेला प्रकाशित होतो. अंकात प्रकाशीत झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही सर्व वादविवाद पनवेल नवी मुंबई न्यायालय कक्षेत.

## संपादकीय..........

# संविधानातील कलम ३६०लागू करा आर्थिक आणिबाणी लावा. सरकारी नोकरांचे पगार ५० टक्के कपात करा.

देश कोविड मुळे अभूतपूर्व संकटात आलेला आहे. गेले दीड वर्षे झाले लॉकडाऊन मुळे रोजगार व व्यवसाय व खासगी क्षेत्रातील लहान व मध्यम व्यवसायिक यांनी प्रचंड वित्तीय हाणी झालेली आहे. देशाचे सकल राष्ट्रीय उत्पन्न उणे पातळीवर आलेलं आहे.

या कोविड परिस्थितीचा सर्वांवर प्रचंड असा आर्थिक व मानसिक ताण-तणाव आलेला आहे. परंतु जे केंद्र किंवा राज्य सरकारचे कर्मचारी किंवा अधिकारी आहेत.त्यांचं कसलंही आर्थिक नुकसान झालेलं नाही.

देशात केंद्र व राज्य सरकांरचे मिळून एकूण पाच कोटी पेक्षा जास्त कर्मचारी व अधिकारी आहेत. देश संकटात असतानाही आमच्या अगोदरच असणाऱ्या भरमसाठी पगारी कमी करा.आणि त्यातून बचत झालेला पैसा हा देशाची आरोग्य व्यवस्था मजबूत करण्यासाठी वापरा. असं आवाहन एकाही सरकारी नोकरदारांने केंलं नाही.पाच कोटी सरकारी नोकरामध्ये एकही माई का लाल देशांसाठी पगारातील एक रुपयांचा सुद्धा त्याग करण्यासाठी तयार नाही. ही फारच शरमेची बाब आहे.

त्यामुळे आत्ता एक निर्णय तातडीने घेण्याची अत्यंत अशी आवश्यकता आहे.

आज आत्ता ताडबतोब देशामध्ये संविधानातील अनुच्छेद -३६० नुसार आर्थिक आणीबाणी लावून देशातील सर्व सरकारी नोकरदारांचे पगार अर्धे कमी करण्यांचा क्रांतीकारी निर्णय घेणे अतिशय आवश्यक आहे. बचत झालेला संपूर्ण पैसा हा लॉकडाऊन मुळे ज्यांचे नुकसान झाले ते सर्व खासगी नोकरदार,शेतकरी,शेतमजूर,यांना मदत म्हणून दिला पाहिजे. तरच लॉकडाऊन मध्ये पिचलेला गरीब व मध्यमवर्ग भारतीयांना खरा दिलासा मिळेल व आपल्या देशाची बिघडलेली आरोग्य व्यवस्था व शिक्षण व्यवस्था निटनेटकी करण्यासाठी देशाला दिलासा मिळेल.

सातव्या वेतन आयोगानंतर देशातील सरकारी कर्मचारी व अधिकारी यांना दिले जाणारे पगार व भत्ते तसेच अन्य सुविधा तसेच निवृत्तीवेतन यांवर एकूण पन्नास टक्के किंवा त्याच्या आसपास इतका प्रचंड महसूल खर्च होत असतो. उत्पन्नांच्या साधारणत: कर्मचाऱ्यांचा पगार ५० टक्के, कर्जाचे व्याज २५,सरकार चालविण्याचा अन्य खर्च १५ असे एकूण ९० टक्के महसूल असा महसूल खर्च होणार असेल तर उरलेल्या दहा टक्क्यात १४० कोटी लोकांना प्रती व्यक्ती काय मिळणार ? ज्या देशात आरोग्यव्यवस्था नीट का नाही ? तर पैसा नाही. शिक्षण व्यवस्था का नीट नाही ? पैसा नाही. न्याय व्यवस्था का नीट नाही ? तर पैसा नाही रस्ते का निट नाहीत ? तर पैसा नाही.विकासासाठी पैसा नाही, लोकांच्या हितासाठी पैसा नाही. सर्वसामान्यांचा प्रश्न येतो तेव्हा सरकारची तिजोरी रिकामी असते.

पण जेव्हा सरकारी कर्मचाऱ्यांचा व अधिकाऱ्यांचा पगार करायचा असतो तेव्हा सरकार ओव्हरड्राफ्ट काढते,कर्ज काढते पण पगार करते म्हणजे करते.

पण सद्या कोविडमुळे देश कोलमडून पडला आहे.तेव्हा सर्व केंद्रीय व राज्य सरकार मधील वर्ग -१ वर्ग -२ व वर्ग -३ या कॅटेगिरीतील सर्वांच्या पगाराला ५० हजारांची कॅप घाला. व त्यापुढील सर्व पगार सरकारच्या तिजोरी जमा करा.आणि ही व्यवस्था पुढील किमान तीन वर्षेसाठी लागू करा.

मग पहा, आरोग्य व शिक्षण व अन्य विकास सुविधासाठी तरतूद तयार होईल व मग देशावर कितीही मोठं सकंट आलं तरी देश आर्थिक दृष्टीने समर्थ असेन.

## सामान्य माणूस विरुध्द नोकरशाही

# सरकारी कार्यालयातील बेकादेशीर बोर्ड हटवा

मी आता जो किस्सा सांगणार आहे तो फारच मजेदार आहे.सरकारी कार्यालयात माझं एक काम होतं म्हणून मी गेला होतो. मी कार्यालयात प्रवेश करताच माझं हसून स्वागत करण्यात आलं. माझं काय काम आहे याची प्रेमळपणे विचारपूस करण्यात आली. माझे काम सहज व सोप्या पद्धतीने कसे होईल याचे मला योग्य मार्गदर्शन करण्यात आले. आणि माझे काम पटकन पूर्ण करून मला कार्यालयातून हसत-खेळत निरोप देण्यात आला.

मित्रहो मी आत्ता जे सांगितलं ते सर्व खोटं आहे.असा अनुभव मला,तुम्हाला किंवा कोणालाही भारतातील सरकारी कार्यालयातून सात जन्मात मिळणार नाही.हो सात जन्मात मिळणार नाही.

खरं हे आहे की, सरकारी कार्यालयाच्या पायऱ्या चढतानांच माझ्या कामामध्ये काही अथडळा तर येणार नाही ना ? असा संशय आला नाही असा एकही माणूस भारतात सापडणार नाही.

भारतातील सरकारी नोकरशाही एक नंबरची लबाड,सुस्त,बेजबाबदार व अप्रमाणिक आहे.अडलेल्या सामान्य नागरिकांचा छळ करणं, त्यांना हतबल करणं व त्यांना लाच देण्यास मजबूर करणं ही भारतीय नोकरशाहीची वर्क कल्चर आहे.

अर्थात याला काही चांगले कर्मचारी अपवाद आहेत.पण अपवादाने तर नियम सिद्ध होतो.म्हणून मी वर जे सांगितलं ते तंतोतंत खरं आहे.

गरीबापासून श्रीमंतापर्यंत करोडो नागरिक रोज व सतत




अप्रत्यक्ष व प्रत्यक्ष टॅक्स भरतात.त्या टॅक्स मधून सरकारी कर्मचारी व अधिकारी यांना प्रत्येक महिन्याला घसघसीत पगार मिळतो. ज्याच्यामुळे आपण व आपली मुलंबाळं दोन टाईम चवीचं खातो व चंगळपूर्ण जीवन जगतो.त्या नागरिकांना सरकारी कार्यालयात आपल्याकडून सौजन्यपूर्ण वागणूक व खात्रीशीर सेवा मिळत नाही. याची जरा सुद्धा लाज भारतीय नोकरशाहीला वाटत नाही.

१.या कार्यालयात जनतेची कोणकोणती कामे करून दिली जातात. २.ती कामं किती दिवसांत पूर्ण केली जातात.३.त्यासाठी कोणती कागदपत्र लागतात.४.काम करून देण्याची जबाबदारी कोणत्या अधिकारी कर्मचारी यांची आहे.५.तसेच त्यांना दिलेल्या कालावधीत काम पूर्ण करून दिले नाही तर कोणाकडे तक्रार करायची अशी

# सरकारी कार्यालयातील बेकादेशीर बोर्ड हटवा

माहिती जी महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायदा २०१५ अन्वये प्रत्येक कार्यालयात प्रदर्शीत करायची आहे. ती माहिती महाराष्ट्रातील कोणत्याही सरकारी कार्यालयात प्रदर्शित केली जात नाही. किंवा जनतेला उपलब्ध करून दिली जात नाही.

माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ अंतर्गत वर्णन केलेली माहिती कोणीही न मागता स्वत: होऊन कार्यालयाने प्रदर्शित व उपलब्ध करायची आहे.पण अशी माहिती दरवर्षी कालबद्धपणे व प्रामाणिकपण एकही सरकारी कार्यालयात अद्यायवत करून जनतेला उपलब्ध करून दिली जात नाही.

या उलट बहूतेक सरकारी कार्यालयात अडलेलं काम पूर्ण करण्यासाठी आलेल्या जनतेला धाक दाखविण्यासाठी व भीती बसावी म्हणून या इमेजमध्ये दाखविल्याप्रमाणे बोर्ड बसविलेले असतात.ही इमेज पहा व वाचा.

भारतीय दंड संहिता अर्थात आयपीसी नुसार सरकारी कर्मचाऱ्यांना सुरक्षा प्रदान करण्यासाठी केलेले कायदे असे शिर्षक देऊन बहूतेक सरकारी कार्यालयात अनाधिकृतपणे सरकारी कर्मचारी व अधिकारी यांनी बोर्ड लावले आहेत.

यातून हे दिसून येतं की नोकरशाहीचे सरकारी कार्यालयात एक प्रकारचे माफिया राज सुरू आहे.

या अनाधिकृत फलकांवर लिहिलेल्या प्रत्येक मुद्याचं आपण आता पद्धतशीरपणे पोष्ट मॉर्टेम करूया.

या बोर्डावर पहिला गुन्हा लिहिला आहे.

मुद्दा १. सरकारी कामात अडथळा आणणे. आयपीसी कलम ३५२ व ३५३ आणि पाच वर्षे सश्रम कारावास.

पण या उलट सरकारी कर्मचाऱ्यांने सामान्य माणसांच्या हक्काच्या कामात हेतूपूर्वक अडथळा आणला तर त्याला मात्र शिक्षा शुन्य मुद्दा २.सरकारी कर्मचाऱ्यांशी वाद घालणे कलम ५०४ दोन वर्षे सश्रम कारावास शिक्षा.

पण या उलट सरकारी कर्मचारी जर सामान्य माणसाला उद्धट बोलला तर त्याला शिक्षा शून्य मुद्दा ३.व ४ व ५ सामान्य जनतेनं सरकारी कर्मचाऱ्याशी वाद घालणे अपशब्द बोलणे व धमकी देणे कलम ५०४ चा भंग व त्यासाठी ३ ते ७ वर्षाची सश्रम कारावास शिक्षा.

पण या उलट हेच काम सरकारी कर्मचाऱ्याने केलं तर तो म्हणजे अधिकारी व साहेब आणि शिव्या खाणारे व अपशब्द सहन करणारी म्हणजे सामान्य जनता. साहेबांना शिक्षा शून्य.

मुद्दा ६.सामान्य जनतेनं सरकारी कर्मचारीकडून खंडणी मागणे कलम ३८३, ३८४ ,३८६ दोन ते दहा वर्षाचा सश्रम कारावास

पण याउलट सरकारी कर्मचाऱ्यांनी लाच मागितली तर शिक्षा शून्य. उलटं चांगली वरकमाई करतो म्हणून त्यांचं अभिनंदन.

मुद्दा ७.सामान्य जनतेनं कार्यालयात जबरदस्ती प्रवेश करणं. आयपीसी कलम ४२७ चे उल्लंघन दोन वर्षेची शिक्षा.

या उलट सरकारी कर्मचाऱ्यांनी कार्यालयात उशिरा येणं हे तर नेहमीचचं. चलता है यार ! उशिरा का होईना येतात ना. हे तर त्यांचे भारतीय जनतेवर उपकारच आहेत. साडे अकरा वाजता येऊनही मस्टरवर सकाळी ९ वाजून ४५ मिनिटाचा टाईम लिहिताना त्यांना स्वत:ला कसलीही लाज वाटत नाही. या बद्दल त्यांना शिक्षा शून्य.

मुद्दा ८.९ व १० सामान्य जनतेनं सरकारी मालमत्तेला नुकसान पोहचविणे, सरकारी दस्तऐवज चोरी करणे, सरकारी दस्तऐवजाला नुकसान पोहचविणे कलम ३७८ व ३७९ तीन वर्ष कारावास शिक्षा

या उलट सरकारी कर्मचाऱ्यांनी कार्यालयातून कोरे कागद,पेन,कोरी पाकीटे,स्टॅपलरच्या पीना व पंचिंग मशीन व सरकारी कॉम्प्यूटर मधील स्पेअर पार्ट अशा वस्तू चोरून घरी नेणे याबद्दल शिक्षा शून्य.

मुद्दा ११. अनाधिकृत जमाव गोळा करणे कलम १४१ व १४३ सहा महिने शिक्षा

याउलट सरकारी कार्यालयातील सर्व कर्मचारी एकत्र

# सरकारी कार्यालयातील बेकादेशीर बोर्ड हटवा

येऊन कटपूर्वक सामान्य माणसाला छळत असतील तर त्याबद्दल शिक्षा शून्य
मुद्दा १२. सरकारी कार्यालयात गोंधळ घालणे कलम १४६,१४८,१५० याउलट सामान्य माणसांचे अर्ज गायब करणे, अर्जाला जोडलेले पूरावा कागद काढून फाडून टाकणे इत्यादि प्रकाराचा सावळा गोंधळ घातल्याबद्दल सरकारी कर्मचाऱ्यांना शिक्षा शून्य.
मित्रहो, हा झाला उपहास,पण सरकारी कार्यालयात असे अनाधिकृत बोर्ड लावणे हा भारतीय जनतेचा व लोकशाहीचा अपमान आहे.जागरूक नागरिक म्हणून असे बोर्ड ज्या सरकारी कार्यालयात लावले असतील तेथील कार्यालय प्रमूखांना सदर बोर्ड कोणत्या कायद्यानुसार,कोणाच्या आदेशाने लावला आहे ?याचा जाब विचारा तसेच ज्या ज्या सरकारी कार्यालयात असे अनाधिकृत व जनतेमध्ये दहशत बसविणारे बोर्ड दिसतील त्या कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये या बोर्ड संबंधी माहिती मागा.या साठी करावयाच्या माहिती अधिकार अर्जामध्ये काय माहिती मागायची याचा एक उत्तम नमूना मला सोशल मिडीयावर मिळालेला आहे तो मी या व्हिडीओच्या डिस्क्रीप्शन मध्ये देत आहे. हा नमूना डाऊनलोड करून घ्या व माहिती जरूर मागा.

सरकारी अधिकारी कर्मचारी यांनी हे ध्यान्यात घ्यावं की तुमची कामाच्या पद्धतीत सुधारणा करून, जनतेची प्रामाणिकपणे व वेगात कामे करून व जनतेला विस्वासात घेऊन तुम्ही तुमचं काम केलं पाहिजे.
असे अनाधिकृत बोर्ड लावून व जनतेला भयभीत करून तुम्ही काय साध्य करू पाहत आहात ? याचे तुम्हीच आत्मपरिक्षण करा.जनता खूप संयमी व सहनशील आहे. तिचा अंत पाहून नका.

## सक्सेस स्टोरी
# आणि गरीबाला रेशनकार्ड मिळाले...



माझ्या गल्लीत एका इसमाचा ३५ ते ४० वर्षाचा रहिवास होता. नाव अभिमन श्रावण माळी पत्ता:- हनुमान नगर, धरणगाव. तालुका धरणगाव जिल्हा जळगाव त्याने रेशन कार्ड मिळविण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केले परंतू रेशन दुकानदार पुरवठा विभाग कडे पाठवायचा आणि पुरवठा अधिकारी रेशन दुकानदार कडे.तो व्यक्ती २ महिन्याआधी माझ्याकडे त्यांची समस्या घेऊन आले.

मी तालुका पुरवठा अधिकारी ला भेटलो व सदर प्रकरण सांगितलं. रेशन कार्ड यादीत त्यांचे नाव नसल्यामुळे नविन रेशन कार्ड मिळणार नाही असे उत्तर मला पुरवठा अधिकाऱ्यांनी दिले.

मी तहसीलदार साहेबांना भेटण्याचा प्रयत्न केला तर कोरोना मुळे आर टी पी सी आर टेस्ट केल्याशिवाय भेटता येणार नाही असे मला सांगण्यात आले. मग मला आर टी आय अर्ज दाखलकरण्याशिवाय पर्याय नव्हता. अर्ज दाखलझाल्यानंतर १० दिवसांनी तहसीलदार साहेबांनी स्वत: फोन करून मला बोलावून घेतले व प्रकरणावर दाखल तारीख देऊन प्रकरण जमा करून घेतले. आणि काल नविन रेशन कार्ड संबंधित व्यक्ती शेतात कामासाठी गेल्यामुळे पुरवठा अधिकाऱ्याने माझ्याकडे दिले. निष्कर्ष:- नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाही. शेवटी मार्ग कोणताही असो नियमाला आधारून सत्कार्य महत्वाचे.

- **प्रभाकर अशोक ठाकूर**
माहिती अधिकार कार्यकर्ता,धरणगांव जि.जळगांव

**ज्या सरकारी कार्यालयात नागरिकांना भीती दाखविण्यासाठी इंडियन पीनल कोड भारतीय दंड संहिताचे बेकायदेशरी बोर्ड लावले आहेत. त्या कार्यालयात हा माहितीचा अधिकार अर्ज नूमना माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी जरूज वापरावा.**

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मिळण्यासाठी अर्ज

प्रती
जन माहिती अधिकारी
कार्यालयाचे नाव व पत्ता ------------------------------------------

१) अर्जदाराचे नाव - ----------------------------------------------
२) अर्जदाराचा पत्ता व संपर्क क्रमांक ---------------------------------
३) हव्या असलेल्या माहितीचा तपशील
अ) माहितीचा विषय - आपल्या कार्यालयाच्या परिसरामध्ये लावलेले फलक
आ) माहितीचा कालावधी – फलक लावल्याच्या दिनांकापासून ते या अर्जाच्या दिनांक़ापर्यंत
इ) हव्या असलेल्या माहितीचे वर्णन-
आपल्या कार्यालयाच्या दर्शनी भागात व परिसरामध्ये सरकारी कर्मचारी व लोकसेवका विरुद्ध केले जाणारे अपराध व त्याबाबत भारतीय दंड संहितेमधीलदंडनीय तरतुदी दर्शविणारे फलक लावलेले आहेत. त्यासंदर्भात खालीलमाहिती पुरविण्यात यावी
१. हे फलक लावण्याबाबत शासनाने काही शासन निर्णय, परिपत्रक, आदेश अथवा बैठकीचे इतिवृत प्रसारित केले असल्यास त्याची प्रत.
२. हे फलक कोणाच्या आदेशाने व कोणत्या तारखेस लावले ती तारीख व आदेशाची प्रत व त्याबाबत ज्या नोंदवहीमध्ये , पत्रात, अहवालात नोंद केली असेलत्याची प्रत .
३. हे फलक तयार करून लावण्यासाठी झालेला खर्च दर्शविणारे कागदपत्र उदा. त्यासाठी मंजूर केलेली टिपणी, कोटेशन मागवले असल्यास त्याचा तुलनात्मक तक्ता, प्रत्यक्ष दिलेले बिल, त्याची पावती व रोख नोंदवहीमध्ये (र्ण्ॅदद०) या खर्चाची केलेली नोंद या सर्वांच्या प्रती.
४. हे फलक लावल्यापासून आज अखेर त्यात नमूद केलेले काही अपराध आपले कार्यालयात घडले असतील तर त्याबाबत एफ. आय. आर ,पोलिसाना दिलेले पत्र इत्यादीच्या प्रती
५. या फलकांच्या बाबत्तीत उपलब्ध असलेल्या सर्व प्रकारच्या माहितीच्या प्रती .
४) माहिती टपालाद्वारे हवी कि व्यक्तिशः ---------------------
५)टपालद्वारे हवी असल्यास - (सर्वसाधारण, नोंदणीकृत की शीघ्र)
६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालीलआहे किंवा कसे -
ठिकाण - अर्जदाराची सही
दिनांक -

# माहिती अधिकार कार्यकर्ता धमकी,मारहाण,हल्ला काय करावे ? काय करु नये ?




मित्रहो , आज आपण माहिती अधिकार कार्यकर्त्यांना धमकी आली किंवा हल्ला झाला तर काय करांव या संबंधी विचार करणार आहोत.

१.माहिती अधिकार अधिनियम २००५ (राईट टू इन्फरमेंशन ॲक्ट २००५ )चा वापर करून प्रशासनातील भ्रष्टाचाराविरोधात लढणारा व प्रशासन पारदर्शक व लोकाभिमूख करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणाऱ्या कार्यकर्त्यांचा एक वर्ग तयार झालेला आहे.त्याला माहिती अधिकार कार्यकर्ता अर्थात आरटीआय ॲक्टीविस्ट असे म्हटले जाते.

२.देशभरात व महाराष्ट्रात असे हजारो आरटीआय कार्यकर्ते या कायद्यानुसार माहिती मागवून सरकारला पारदर्शक काम करण्यासाठी भाग पाडण्याचे उत्तम काम करीत आहेत.

३.आपल्या देशातील शासन व प्रशासन व्यवस्था वर पासून खालपर्यंत कमालीच भ्रष्ट आहे.

४.शासन व नोकरशहा यांच्या भ्रष्ट व चूकीच्या कामाचे काळे कारनामे व पुरावे सरकारी फाईल्सच्या पाना-पानवर दडलेले आहेत.

५.माहिती अधिकारांमध्ये अर्ज करून माहिती मागणारा व्यक्ती सरकारी यंत्रणेच्या दृष्टीकोनातून शत्रू ठरतो.अशा वेळी ज्यांचे गैर हितसंबंध दुखावले असे लोक माहिती अधिकार कार्यकर्त्यांना धमकी देणे, मारहाण करणे असे प्रकार करीत असतात.

६.त्यामुळे माहिती अधिकार कार्यकर्ता म्हणून काम करणं हे अतिशय संवेदनशील,जबाबदारीचे व जोखमीचे काम आहे.

७.जेथे कायदा मोडून गैरमार्गवापरून मोठा फ्रॉड व मोठे




आर्थिक हितसंबंध जोपासले जातात .जेथे अशा गैर प्रकरणात सरकारी यंत्रणेमधील लोकप्रतिनिधी व नोकरशाही लाभार्थी असतात.अशा प्रकरणातील माहिती जर मागीतली तर अशा प्रसंगी माहिती अधिकार कार्यकर्त्यांना धमकी देणे, मारहाण होणे व जीवघेणा हल्ला होण्याची शक्यता असते.

# धमकी,मारहाण,हल्ला काय करावे ? काय करु नये ?

८.नियम तोडून होणारे शहरी बांधकाम,जमीनीसंबंधी गैरव्यवहार,खनिजांची अवैद्य लूट,सरकारच्या मोठया खरेदीतील कमीशन्स,नियम तोडून होत असलेला पर्यायवरणचा लूट व शोषण ,कंत्राटदारी पद्धतीने दिले जाणारे ठेके सरकारी रस्ते व इमारतीचे बांधकाम,आरोग्य व शिक्षण क्षेत्रातील लूटारू आस्थापना,बोगस औषध निर्माण, परवाने व लायसन्स दिले जाणारे सर्व सरकारी विभाग अशा ठिकाणची माहिती मागीतली तर तुमची सुरक्षा धोक्यात येण्याची शक्यता असते.

९.मोठया प्रकरणात तर सोडाचं अगदी ग्रामपंचायतीमध्ये तुम्ही माहितीचा अर्ज टाकला तर सरपंचाकडून मारहाण करण्याची फोनवरून किंवा प्रत्यक्ष धमकी येण्याचे कित्येक प्रकार घडले आहेत. घडत आहेत.

धमकी आली किंवा मारहाण झाली किंवा हल्ला झाला तर तर माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी काय करायचं ?

धमकी आली तर ते हलक्याने घेऊ नये. धमकी येताचं संबंधीत धमकी देण्याऱ्यांच्या नावे विनाविलंब पोलीस स्टेशनला जाऊन तक्रार दाखल करावी.पोलीसांना सत्य वस्तूस्थिती कथन करावी. गुन्हयाची तीव्रता व तुमच्या सुरक्षेची आवश्यकता पाहून पोलीस योग्य त्या कायद्याद्वारे व कलमाद्वारे दखलपात्र किंवा अखदलपात्र गुन्हा नोंद करून घेतील.त्यांची कॉपी मागून घेऊन तुमच्याकडे असू द्या.अखदखपात्र गुन्हयामध्ये तपास व्हावा अशी तुम्हाला आवश्यकता वाटत असेल तर पोलीसांनी तपास करावा असे कोर्टामधून आदेश मिळवून घ्या.

जर हाताने मारहाण, शारिरीक हल्ला,गंभीर जखम, काठीने किंवा धारदार शस्त्राने मारहाण किंवा प्राणघातक हल्ला झाला असेल तर त्या त्या कृतीप्रमाणे पोलीसाकडे सत्य कथन करून तक्रार करावी.आणि संबंधीत आरोपी विरोधात गुन्हयाच्या तीव्रतेनुसार एफआरआय नोंदविण्याचा आग्रह धरावा.

जर पोलीस एफआरआय नोदविण्यांस तयार नसतील तर पोलीसांच्या वरीष्ठ कार्यालयात मारहाण झाल्याचा तसेच पोलीस स्टेशनला एफआरआय नोंदवून घेत नसल्याची लेखी तक्रार करावी.

लक्षात घ्या प्रत्येक व्यक्तीच्या जीवन सुरक्षेची अर्थात लाईफ सेक्युरिटीची अंतिमत: सरकारवर जबाबदारी असते.

धमकी आलेल्या किंवा मारहाण झालेल्या माहिती अधिकार कार्यकर्त्यांच्या जीवाला धोका होऊ नये. म्हणून महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय काढलेला आहे. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासन गृहविभाग शासन निर्णय क्रमांक सीआरटी-२०१२/प्र.क्र.६९६/ पोल -११ दिनांक :२७ फेब्रुवारी २०१३ असा असून त्यांचा सांकेतांक २०१३०२२७१२११५५५८२९ हा आहे. सदर शासन निर्णयांन्वये सामाजिक कार्यकर्ते / माहिती अधिकार कार्यकर्ते व व्हिसल ब्लोअर कार्यकर्ते यांना आवश्यकतेनुसार मोफत पोलीस संरक्षण मिळते.या शासन निर्णयाची प्रत या व्हिडीओच्य खाली डिस्क्रीप्शन मध्ये दिली आहे. जिज्ञासूनी ती डाउनलोड करून घ्यावी.

सदर शासन निर्णया अन्वये पोलीस संरक्षण मिळावे यासाठी पोलीस आयुक्त किंवा जिल्हा पोलीस निरिक्षक कार्यालयाकडे सरंक्षणाची मागणी करावी. सदर जी.आर.मध्ये नमूद केल्या प्रमाणे असुरक्षीत माहिती अधिकार कार्यकर्त्यांना पोलीस सरंक्षण मिळू शकते.

असुरक्षीत कार्यकर्त्यांनी या कायदेशीर पर्यायाचा प्राधान्याने वापर करून स्वत:ला सुरक्षीत करणे गरजेचे आहे.

# धमकी,मारहाण,हल्ला
# काय करावे ? काय करु नये ?

त्या शिवाय अन्य पर्यायी मार्गाने कार्य करून माहिती अधिकार कार्यकर्त्यांना स्वत:ल सुरक्षीत ठेवता येते. ते पर्याय पुढील प्रमाणे आहेत.

१. माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी एकट्याने काम करू नये. गटाने किंवा समुहाने काम करावे.

२. जो अर्ज केल्यामुळे एका कार्यकर्त्याला धमकी आली तोच अर्ज अन्य पाच किंवा अधिक कार्यकर्त्यांनी त्यांच सरकारी आस्थापनाला द्यावा. एक कार्यकर्त्यांस धमकी देणे मारहाण करणे सहज व सोपे असते पण अधिक संख्येने असलेल्यांना धमकी देणे मारहाण करणे सोपे नसते.

३.भ्रष्टचाराविरोधात कार्य करणाऱ्या नागरिकांचा समूह किंवा कम्युनिटी आर्गनायझेन्स बरोबर काम करावे.

४.तुम्ही सरकार मध्ये होत असलेल्या भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवत असाल तर तुमच्या बरोबर समाजातील मोठा हिस्सा सामील व्हावा म्हणून तुमच्या कामाला लोक आंदोलनांचे स्वरूप द्या. तुमच्या कामात लोकांचा लक्षणीय सहभाग वाढवित चला.

५.माहिती आधिकार कार्यकत्यांने त्याचे कार्य अधिक पारदर्शक ठेवावे. स्वत:ची प्रतिमा खराब होऊ नये यासाठी काळजीपूर्वक कार्य करावे.

६ .

सरकार,प्रशासन,पोलीस,पत्रकारीता,व्यापार,व्यवसाय,न्याय ादान,डॉक्टर्स,शिक्षक अशा महत्वाच्या क्षेत्रात काही चांगले लोक असतात काही वाईट लोक असतात. अगदी त्यांच प्रमाणे माहिती अधिकार क्षेत्रात काम करणाऱ्या मध्ये काही चांगले तर काही चूकीचे काम करणारे लोक आहेत.माहिती अधिकरांचे नावाखाली भ्रष्ट लोकांकडून पैसे व अन्य लाभ वसूलीचे काम केले जाते. अशा चूकीचे काम करणाऱ्या मंडळीना मारहाण झालीच तर समाजाकडून सहानुभूती मिळत




नाही.त्यामुळे चूकीचे काम करू नये. जे चूकीचे व अप्रमाणीक काम करतात ते इमानदार कार्यकर्त्याचे एक नंबर शत्रू आहेत.

७. गेले दहा वर्षे माहिती अधिकार कार्यकर्ता म्हणून कार्य केल्यानंतर मी एक सल्ला देऊ इच्छितो की बचावाचे व सुरक्षीततेचे सर्व उपाय करून व शक्यतो सर्व ती काळजी घेतल्यानंतरही १०० टक्के सुरक्षीततेची हमी नसते.

तेव्हा माहिती अधिकार कार्यकर्ता म्हणून कार्य करताना जोखमीची शक्यता लक्षात घेऊन व कलक्यूलेटेड रिस्क घेऊन काम करावे.अशी एक सूचना मी देऊ इच्छितो.

त्याच बरोबर मी हे ही सांगू इच्छितो की माहिती अधिकार क्षेत्रात कार्यकर्ता म्हणून काम करणं हे एक थ्रील आहे. एक साहस आहे. एक हिंमत आहे. स्वत:च्या क्षमता वाढविण्याची संधी आहे. खूप काही शिकण्याची ही संधी आहे.तसेच इमानदारीने काम करणे ही एक देशसेवा सुद्धा आहे.

प्रत्येक तरुणांनी किमान काही काळ तरी माहिती अधिकार कार्यकर्ता बनून नक्कीच देशसेवा केली पाहिजे.



# माया अशोक मगर

## बेस्ट ॲक्टीविस्ट ऑफ द मंथ, जूलै २०२१



माया अशोक मगर, या गवळीनगर,खर्डी ता.शहापूर जि.ठाणे येथे राहतात.

मायाताई जेथे राहतात ते गवळीनगर ही खर्डी गावातील शासकीय जमीनवर वसलेली साधारण ४० ते ५० झोपडीपट्टी व लहान घरे असणारी वसाहत आहे.गवळीनगरात राहणारी बहुतेक कुटुंब ही आदिवासी,एस.सी.एस.टी बहूल कुटुंबे आहेत. ही गरीबांची वस्ती आहे.

ही वस्ती शासनांच्या कागदावर अनाधिकृत वस्ती आहे.या वस्तीला पंधरा वर्षापासून वीज नव्हती, पाण्याची पुरेसी सोय नाही.वस्तीकडे यायला रस्ता नाही,घरांच्या जमीनी अजूनही राहणाऱ्यांच्या नावावर नाही. वीजेची सोय नसल्याने रात्री वस्तीकडे येताना अंधारात पायाखाली साप येतात. या सगळया येथे समस्या होत्या.

मायाताई मला साधारणत: २०१५-१६ च्या दरम्यान शहापूर येथे एका मिटिंगमध्ये मला भेटल्या.त्या माहिती अधिकार महासंघाच्या सभासद झाल्या.मायाताईचं शिक्षण फारसं झालेलं नाही.सार्वजनिक जीवनातला कसलाही अनुभव नाही.

माहिती अधिकार कायद्याची सुद्धा त्यांना सुरवातीला काहीच माहिती नव्हती. पण आपण जिथं राहतो ते गवळीनगर वस्ती अधिकृत झाली पाहिजे.वीज,पाणी व रस्ते मिळाले पाहिजेत हा एकच ध्यास मायाताईंना लागलेला आहे.

अनाधिकृत वसाहतीला नागरी सुविधा मिळवूण देणे हे जगातलं सर्वात अवघड प्रशासकीय काम असतं.शासन लक्ष घालत नाहीत. सरकारी अधिकारी अडवणूक करतात.समाज सहकार्य करीत नाही.

वस्तीतल्या लोकांना एकत्रीत करायचं.त्यांना प्रश्न समजावून सांगायचा.मग सरकारी यंत्रणेकडं अर्ज करायचा. अर्जाची दखल घेतली नाही तर माहिती अधिकार वापरून जाब विचारायचा. त्याचाही काही उपयोग झाला नाही तर मग उपोषण व आदोलनांचा मार्ग वापरायचा. हे लिहणं खूप सोप्प आहे. प्रत्यक्षात रस्त्यावर उतरून संघर्ष करणं फार फार अवघड आहे.

गेली पंधरा वर्षे झाली त्यांच्या वस्तीला सोयीसुविधा मिळाव्यात म्हणून मायाताई लढत आहेत. लढाई आणखी ही थांबलेली नाही.

माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी नुसतं माहितीचे अधिकार टाकून माहिती जमा करणे इतकंच मर्यादित काम करणं अपेक्षित नाही. तर समाजातील निकडीचे प्रश्न ओळखून ते सोडविण्यासाठी सामाजिक कार्य करीत राहणं आवश्यक आहे. मायाताई कडून इतरांनी हा आदर्श घेतला पाहिजे.

महावितरण कडे शेकडो अर्ज केलें. उपोषण व आंदोलने केली. वीज मंडळातील लाच खोर आधिकाऱ्यांशी सामना केला. इतक्या परिश्रमानंतर जेव्हा गवळीनगर मध्ये पंधरा वर्षाच्या संघर्षानंतर लाईट आली.त्या दिवसी मायाताईचा विजय झाला होता.ज्या पहिल्या रात्री जेव्हा जेव्हा लाईटचे दिवे लागले तेव्हा गवळीनगर आणि मायाताईचा चेहरा हे दोन्ही उजळले होते.

आता पुढे नळ,पाणी,रस्ते आणि अन्य सुविधा या साठी मायाताईचा संघर्ष चालूच राहणार आहे.



ठाणे + पालघर

अवतीभवती

खर्डी : आदिवासी बांधवांना मीटरचे वाटप करताना अधिकारी.

### खर्डीतील आदिवासी वस्ती उजळणार

खर्डी (बातमीदार) : 'महावितरण आपल्या दारी' या योजनेंतर्गत खर्डीतील गवळीनगर येथील ४२ कुटुंबियांच्या घरात ५५० रुपयांत वीजजोडणीचे मीटर बसवण्यात आले. गवळीनगरमधील रहिवासी गेल्या १५ वर्षांपासून वीजपुरवठा होत नसल्याने अंधारात जीवन जगत होते. त्यांच्या या गैरसोयीची दखल घेत खर्डीच्या महावितरण कार्यालयाचे उपसहायक अभियंता बाबा नगरे यांनी आदिवासी कुटुंबाकडून कागदपत्रांची पूर्तता करून घेतली. तसेच या वस्तीपर्यंत विद्युत खांब उभारून वीजपुरवठा ... करून दिला. 'वीज आल्याने आमची पोरं-बाळं ...

11:22 am

गरीबांना सुविधा मिळाव्यात म्हणून शासनाकडे माहिती अधिकार वापरून सतत संघर्ष करणाऱ्या मायाताई मगर या माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या बेस्ट ॲक्टीविस्ट ऑफ मंथ जूलै २०२१ (महिन्यातील सर्वोत्कृष्ट कार्यकर्ता )या पुरस्कारांच्या मानकारी आहेत.

पंधरा वर्षाच्या संघर्षानंतर मायाताई आता विचारानं खूप अनुभवी व परिपक्व झाल्या आहेत.

मायाताई तुमचं महासंघ व मासिक नागरिक अधिकार व आपले हजारो कार्यकर्ते यांच्या वतीनं अभिनंदन !

तुम्ही लढत रहा, आम्ही हजारो कार्यकर्ते आपल्या सोबत आहोत.


## रेडीमेड अर्ज नमूने आजच खरेदी करण्यासाठी खालील लिंक गुगल सर्च करा.

## www.instamojo.com/subhashbaswekar


















# www.rtimahasangh.weebly.com

# www.facebook.com/rtimahasangh/

## Whats App - 9223516920

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुभाष महादेव बसवेकर यांनी स्वराज प्रिंट प्रोसेस कार्यालय, सेक्टर-१०, कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे मुद्रीत करून, फ्लॅट-३०५ वसूधा सोसायटी प्लॉट नं.५३ सेक्टर-४-बी आसूडगांव खांदा कॉलनी ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे प्रकाशीत केले.

RNI रजि नं. MAHMAR/2011/40781